# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
# MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES
(An ISO 9001:2008 Certified University)
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक–४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
Tel : (0253) 2539190 Fax : (0253) 2539195
Website : www.muhs.ac.in, E-mail : ugacademic@muhs.ac.in

**डॉ. काशिनाथ दा. गर्कळ** पीएच्.डी.
**कुलसचिव**

**Dr. Kashinath D. Garkal** Ph.D.
**Registrar**


जा. क्र. मआविवि/ई.३/१८/पदवी/४७४८ <u>महत्वाचे/तातडीचे</u> दि.२०/०६/२०१६

प्रति,
प्राचार्य,
सर्व संलग्नित युनानि महाविद्यालये,
मआविवि, नाशिक.

विषय :- सुधारित प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष बी.यु.एम.एस. (पदवी) अभ्यासक्रम लागू करणेबाबत...
संदर्भ :-१) भा.चि.के.प. यांचे पत्र क्र.११-७६/२०१३-२-(युनानि सिलॅबस), दि.२४/१०/२०१३,
२) भा.चि.के.प. यांचे पत्र क्र.११-७६/२०१३-२-(युनानि सिलॅबस), दि.२७/०६/२०१४,
३) दि.१६/०५/२०१६ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.४८, ४९ व ५०/२०१६,

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयांकित प्रकरणी भारतीय चिकित्सा केंद्रिय परिषद, नवी दिल्ली यांच्याकडून उक्त संदर्भीय पत्र क्र. १ व २ अन्वये सुधारित प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष बी.यु.एम.एस. (पदवी) अभ्यासक्रम प्राप्त झाला होता. सदर अभ्यासक्रम अभ्यासमंडळ, विद्याशाखा व विद्यापरिषदेने मान्य केलेला आहे.

त्यासअनुसरुन, प्राप्त आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, मा. विद्यापरिषदेने पारित केलेल्या ठरावानुसार "भा.चि.के.प., नवी दिल्ली यांनी बी.यु.एम.एस. पदवी करीता विहित केलेला सुधारित अभ्यासक्रम हा शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ मध्ये प्रथम वर्ष बी.यु.एम.एस. करीता प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थी तुकडीपासुन लागू राहील. तसेच, जे विद्यार्थी प्रथम वर्ष परीक्षा उत्तीर्ण होऊन द्वितीय वर्षात प्रवेशित होतील त्या विद्यार्थ्यांना क्रमशः शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता द्वितीय वर्ष व शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता तृतीय वर्ष सुधारित अभ्यासक्रम लागू राहील."

सदर सुधारित प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष बी.यु.एम.एस. अभ्यासक्रमाची प्रत विद्यापीठ संकेतस्थळावर (www.muhs.ac.in) प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर बाबत महाविद्यालय स्तरावर त्वरीत यथायोग्य कार्यवाही करण्यात यावी व सर्व संबंधितांना उपरोक्त बाब अवगत करण्यास्तव सदर पत्रास सुचनाफलकावर प्रसिध्दी देण्यात यावी. याची नोंद घ्यावी.

स्वा/-
कुलसचिव

प्रत :- १) परीक्षा नियंत्रक, मआविवि, नाशिक.
२) अधिष्ठाता, आयुर्वेद व युनानि विद्याशाखा, मआविवि, नाशिक.
३) संगणक विभागप्रमुख, मआविवि, नाशिक.
यांनी सदर पत्र व अभ्यासक्रमाची प्रत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करावी.

**<u>Year Wise Syllabus:-</u>**

**<u>First Year</u>**

**<u>Secound Year</u>**

**<u>Third Year</u>**